


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३०६ वा    शनिवार    दि २१ फेब्रुवारी २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# ठाकरे आणि शिंदेंची हातमिळवणी, कुठे घडला चमत्कार? दोन्ही शिवसेनांच्या युतीने राजकारणात चर्चांना उधाण

**वृत्तसंस्था/ अमरावती**

राज्य पातळीवर शिवसेना आणि शिवसेना (उबाठा)तील राजकीय वाद शिगेला पोहचला असताना अमरावतीमध्ये दोन्ही पक्ष एकत्र आले. बहुजन समाज पक्षाच्या साथीने दोन्ही शिवसेनेनी स्वतंत्र गटाची स्थापना करीत माजी नगरसेवक दिनेश बूब यांना स्वीकृत सदस्य म्हणून निवडले. या अनपेक्षित युतीची अमरावतीच्या राजकीय वर्तुळात चर्चा वाढली आहे. अमरावती महापालिकेची पहिली सभा शुक्रवारी महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमहापौर सचिन भेंडे व आयुक्त सौम्या शर्मा यांच्या उपस्थितीत झाली. या सभेत आठ स्वीकृत नगरसेवक आणि स्थायी समितीच्या १६ सदस्यांची निवड झाली. स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीत मतांच्या मूल्यानुसार भाजप आणि काँग्रेसला प्रत्येकी दोन जागा मिळाल्या. भाजपकडून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. प्रशांत देशपांडे आणि प्रा. संजय तिरथकर यांची वर्णी लागली. काँग्रेसने माजी महापौर मिलिंद चिमोटे आणि अनिल अग्रवाल यांच्यावर विश्वास दाखविला. युवा स्वाभिमान पक्षाने संजय हिंगासपुरे, राष्ट्रवादी काँग्रेसने भोजराज काळे, तर एमआयएमने सै. मुनज्जर अली यांना संधी दिली. ठाकरे-शिंदे-बसप गटाकडून दिनेश बूब यांची निवड झाली. महापालिकेची आर्थिक सूत्रे हाती ठेवणाऱ्या स्थायी समितीच्या १६ सदस्यांची अविरोध निवड झाली. संख्याबळानुसार भाजपचे पाच सदस्य निवडले गेले. युवा स्वाभिमान पक्ष आणि काँग्रेसचे प्रत्येकी तीन, राष्ट्रवादी काँग्रेस व एमआयएमचे प्रत्येकी दोन, तर शिवसेना गटाचा एक सदस्य स्थायी समितीत दाखल झाला. भाजपने मिलिंद बांबल, पद्मजा कौंडण्य, पंचफुला चव्हाण, स्मिता सूर्यवंशी आणि विनोद तनवाईस यांना संधी दिली. युवा स्वाभिमान पक्षाचे प्रशांत वानखडे, प्रियंका पाटणे आणि दीपक साहू; काँग्रेसचे ललिता रतावा, प्रशांत महल्ले व अस्मा फिरोज खान; राष्ट्रवादीचे अविनाश मार्डीकर व मीनल सवाई; एमआयएमचे सल्लाउद्दीन इक्राममुद्दीन व नाझीम खान करीम खान तर शिवसेनेकडून मंजुषा जाधव यांचा समावेश झाला. शिवसेनेचे ठाकरे-शिंदे गट अमरावतीत एकत्र आल्याने पुढील महापालिका राजकारणात नवे समीकरण किती काळ टिकते, याकडे आता साऱ्यांचे लक्ष लागले आहे. शिवसेना-शिवसेना (उबाठा)-बसप या नव्या गटाने दिनेश बूब यांना पुढे करत राजकीय वर्तुळात खळबळ उडविली. बूब यांना युवा स्वाभिमान पक्षाची साथ लाभल्याची चर्चा आहे. आमदार रवी राणा आणि बूब यांच्यातील राजकीय संघर्ष सर्वश्रुत आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत बूब यांनी प्रहारतर्फे भाजपच्या नवनीत राणा यांच्याविरोधात लढत दिली होती. पराभवानंतर दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोप झाले होते. मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीनंतर राणा यांनी आपला आणखी एक स्वीकृत सदस्य निवडून आणण्याची संधी असतानाही बूब यांना पाठिंबा दिल्याचे बोलले जाते. महायुतीच्या सत्ता समीकरणात भाजपकडे महापौरपद, युवा स्वाभिमान पक्षाकडे उपमहापौरपद गेल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसने स्थायी समितीच्या सभापतिपदावर दावा केला आहे. ११ नगरसेवकांच्या बळावर राष्ट्रवादीकडे निर्णायक भूमिका आहे. स्थायी समितीत महायुतीचे दहा सदस्य असल्याने सभापतिपदासाठी राष्ट्रवादीचा मार्ग सुकर मानला जात आहे. ज्येष्ठ नगरसेवक अविनाश मार्डीकर यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. त्यांनी यापूर्वी चार वेळा स्थायी सभापती म्हणून काम पाहिले आहे. अनुभव,



प्रशासनावर पकड आणि आर्थिक विषयांतील जाण या जोरावर मार्डीकर यांची उमेदवारी भक्कम मानली जाते. मात्र अंतिम निर्णयात भाजप-युवा स्वाभिमानची भूमिका काय राहते, याकडे लक्ष आहे. भाजपचे ॲड. प्रशांत देशपांडे यांना स्वीकृत सदस्यपद मिळणे हीदेखील चर्चेची बाब ठरली. अमरावतीच्या पहिल्या महिला महापौर विद्या देशपांडे यांचे पुत्र असलेल्या प्रशांत देशपांडे यांना अंबापेठ प्रभागातून उमेदवारी नाकारल्यानंतर नाराजी उसळली होती. ती शमवण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे स्वत: त्यांच्या निवासस्थानी गेले होते. त्यावेळी स्वीकृत सदस्यपदाचा शब्द देण्यात आल्याची चर्चा होती. आजच्या निर्णयाने तो शब्द पाळला गेला. प्रचारादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शोमध्ये देशपांडेंना विशेष स्थान देण्यात आले होते. त्या चर्चांवर आज औपचारिक शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# RTI कार्यकर्त्याला अजित पवार यांच्या अपघाताच्या दिवसाचे विमानतळावरचे CCTV फुटेज देण्यास विमान वाहतूक विभागाचा नकार

**वृत्तसंस्था/ बारामती**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनानंतर त्यांच्या मृत्यूबाबत राज्यभरातील जनतेत तसेच कार्यकर्त्यांमध्ये विविध शंका आणि प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेषतः अपघाताच्या दिवशी मुंबई विमानतळावर काय घडले, याबाबत सत्य परिस्थिती समोर यावी, या मागणीसाठी माहिती अधिकाराच्या माध्यमातून सीसीटीव्ही फुटेज मागविण्यात आले होते. मात्र केंद्रीय नागरी सुरक्षा व विमान वाहतूक विभागाने संबंधित माहिती देण्यास नकार दिल्याचा दावा आरटीआय कार्यकर्ता नितीन यादव यांनी केला आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या प्रकरणात विविध तपास यंत्रणांकडून तपास सुरु आहेत. त्यामुळे हे प्रकरण अतिशय संवेदनशील आणि महत्त्वाचं मानलं जात आहे. आमदार रोहित पवार, आमदार अमोल मिटकरी यांनी या घटनेवर विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रवादी काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या प्रकरणी सीबीआय चौकशीची मागणी केली आहे. राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांनी याबाबतचं निवेदन मुख्यमंत्र्यांना दिलं आहे. तसेच राज्य सरकारकडूनही यासाठी महत्त्वाचे पावलं उचलण्यात आली आहेत. राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार हे प्रचाराच्या निमित्ताने बारामतीला जात असताना विमान अपघाताची दुर्दैवी घटना घडली होती. गेल्या महिन्यात २८ जानेवारीला पहाटे ८.४६ वाजेच्या सुमारास या अपघाताची घटना घडली होती. या अपघातात अजित पवार यांचं निधन झालं होतं. अजित पवार यांच्या निधन झाल्याच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. अजित पवार यांच्यासारख्या एका दिग्गज नेत्याचं अशाप्रकारे निधन होईल, असं कुणालाही वाटलं नव्हतं.

# फ्रेंच मैत्रीचे पुढचे पाऊल



फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉन हे या वर्षात भारताच्या दौऱ्यावर आलेले तिसरे युरोपीय नेते. गेल्या महिन्यात जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मर्ज आणि युरोपीय महासंघाच्या अध्यक्षा उर्सुला व्हांडर लायन यांनी भारताला भेट दिली होती. युरोपीय महासंघाबरोबरील व्यापार करार आणि तेथील विविध देशांशी द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी होत असलेले प्रयत्न भारताचा युरोपकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट करणारे आहेत. सध्या अमेरिका, रशिया, चीन या बड्या शक्ती असल्या, तरी जगाची वाटचाल हळूहळू बहुध्रुवीय रचनेकडेही होताना दिसते आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मॅक्रॉन यांची मंगळवारी भेट झाली, त्याच वेळी माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र असलेल्या बेंगळूरुत दोन्ही देशांचे संरक्षणमंत्रीही भेटले. मोदी आणि मॅक्रॉन यांनी दोन्ही देशांतील मैत्रीचे पर्व पुढच्या टप्प्यावर नेण्याचे सूचित केले, तर राजनाथ सिंह आणि कॅथरिन वोखा यांनी संरक्षण क्षेत्रातील सहकार्य अधिक बळकट करण्यावर भर दिला. फ्रेंच बनावटीच्या राफेल लढाऊ विमानांबाबत दोन्ही देशांत यापूर्वीच करार झाला असून, आता ङ्गएच १२५ हेलिकॉप्टरफबाबतही पुढची पावले पडली आहेत. त्याचबरोबर ङ्गहॅमरफ क्षेपणास्त्रांसाठी संयुक्त प्रकल्पही हाती घेतला आहे. ङ्गराफेलफ विमानांपासून हेलिकॉप्टरपर्यंत आणि क्षेपणास्त्रांपासून पाणबुड्यांपर्यंत दोन्ही देशांतील वाढते सहकार्य सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. हेलिकॉप्टरचे उत्पादन भारतात, कर्नाटकातील वेमगल येथे होणार आहे. मोदी-मॅक्रॉन भेटीदरम्यान संरक्षण आणि सामरिक सहकार्यासह वीसहून अधिक मुद्द्यांवर झालेली सहमती दोन्ही देशांमधील नजीकता स्पष्ट करणारी म्हणावी लागेल. भारत आणि फ्रान्स यांच्या संरक्षणमंत्र्यांची नियमित बैठक होते. त्याद्वारे संरक्षण सहकार्य वृद्धिंगत केले जाते. तंत्रज्ञान हस्तांतरणापासून उभयपक्षी लष्करी अधिकाऱ्यांच्या आदान-प्रदान योजनेपर्यंतचे निर्णय यातून झाले आहेत. राजनाथसिंह आणि वोखा यांच्या बैठकीत झालेले निर्णय महत्त्वाचे आहेतच; परंतु देशांतर्गत उत्पादन करण्याला बळकटी मिळणे आवश्यक आहे. त्या दिशेने पावले पडताहेत हे अधिक महत्त्वाचे. संरक्षणमंत्र्यांच्या बैठकीच्या धर्तीवर परराष्ट्रमंत्रीही आता दर वर्षी संवाद साधणार आहेत. २०२३मध्ये दोन्ही देशांतील सामरिक भागीदारीला २५ वर्षे पूर्ण झाली, त्यावेळी पुढील २५ वर्षांसाठीची दिशा निश्चित केली गेली. ङ्गहोरायझन २०४७फ या नावाने कार्यक्रम आखला गेला. त्याच्या अंमलबजावणीसाठी मंत्रीस्तरावरील नियमित बैठका उपयुक्त ठरतील, यात शंका नाही. भारतात गेल्या दोन दशकांपासून नवोन्मेषाचा (इनोव्हेशन) उल्लेख केला जात आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अफलातून संकल्पना मांडून ती संशोधनाद्वारे सिद्ध करण्यासाठीची प्रतिभा आपल्याकडे नाही असे नाही; परंतु त्याला पोषक वातावरणाची गरज असते. नवोन्मेषाला प्रोत्साहन देत या गरजेची पूर्तता करण्याचा प्रयत्न होत असला, तरी तो पूर्णपणे यशस्वी झालेला नाही. फ्रान्सच्या सहकार्याने नवोन्मेष वर्ष साजरे करण्याचा आणि त्याद्वारे नवोन्मेष साकारणाऱ्यांचे जाळे विस्तारण्याचा निर्णय पोषक वातावरणासाठी उपयुक्त ठरू शकतो. आजच्या काळात विविध प्रकारचा आशय (कंटेंट) निर्माण करण्याला महत्त्व आहे; त्यासाठी देशभरातील पंधरा हजार महाविद्यालयांत प्रयोगशाळा निर्माण करण्याचा निर्णयही याला पूरक असाच आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाबाबत नवी दिल्लीत भरलेल्या महामेळ्यास मॅक्रॉन उपस्थित राहतील. ङ्गएआयफच्या क्षेत्रात विकसनशील देशांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठीचा भारताचा हा प्रयत्न महत्त्वाचा. मॅक्रॉन यांच्यासह अन्य प्रमुख नेत्यांमुळे हा महामेळा प्रतिष्ठेचाही झाला आहे. प्रगत देशांच्या ङ्गजी ७फगटाची यंदाची परिषद फ्रान्समध्ये होत असून, मॅक्रॉन यांनी मोदींना त्याचे निमंत्रण दिले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी उगारलेले धोरणास्त्र, बदलते जागतिक राजकारण, रशिया-युक्रेन युद्ध, त्याचा अर्थव्यवस्थेवर होत असलेला परिणाम, ङ्गएआयफसारख्या तंत्रज्ञानामुळे एकाच वेळी निर्माण झालेल्या संधी आणि आव्हाने आणि देशांतर्गत परिस्थिती यांमुळे अनिश्चितता वाढली आहे. तिला परिस्थितीनुरूप प्रतिसाद देत भारताला वाटचाल करणे गरजेचे आहे. वास्तविक ही आव्हाने केवळ भारतासमोरच नव्हे, तर अन्य देशांसमोरही आहेत. त्यामुळे उभयपक्षी सहकार्य वाढणे गरजेचे ठरते. त्या दृष्टिकोनातून फ्रान्ससारख्या देशांबरोबर दृढ होत असलेल्या संबंधांचा परिणाम सकारात्मक आहे, यात शंका नाही. मोदी-मॅक्रॉन यांची भेट द्विपक्षीय संबंधांसाठी महत्त्वाची आहेच; परंतु ती बहुध्रुवीय जगासाठीही महत्त्वाची आहे




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# शरद पवार भाजपसोबत जाण्याची भीती, राज्यसभेवर पाठवण्यास काँग्रेसमधून विरोधाचा सूर

**मुंबई :** राज्यसभेसाठी राज्यातील सात जागांचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने बुधवारी जाहीर केला असून, या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांकडून पवारांच्या नावाला विरोधाचा झेंडा दाखविण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. राज्यसभेच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान होईल. राज्यसभा निवडणूक जाहीर झाल्याने राजकीय पक्षांमध्ये मतांची जुळवाजुळव सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर जवळपास निकालात निघालेल्या महाविकास आघाडीच्या ऐक्याची या निवडणुकीत कसोटी लागणार आहे. त्यात महाविकास आघाडीच्या वाट्याला





राज्यसभेची एकच जागा येत असल्याने ती राष्ट्रवादी (शप) पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना दिली जाणार की, अन्य कोणाला याची जोरदार चर्चा रंगली आहे. महाविकास आघाडीची एकजूट महत्त्वाची ठरणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, फौजिया खान, भाजपचे डॉ. भागवत कराड, धैर्यशील पाटील, रिपब्लिकन पक्षाचे नेते तथा केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, काँग्रेसच्या रजनी पाटील आणि शिवसेना (उबाठा) पक्षाच्या प्रियांका चतुर्वेदी यांची राज्यसभेची मुदत दोन एप्रिल २०२६ रोजी संपत आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राहुरीचे शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे विधानसभेतील दोन जागा रिक्त आहेत. विधानसभेत भाजपचे १३१, शिवसेनेचे ५७, राष्ट्रवादी काँग्रेसचे ४०, शिवसेना (उबाठा) पक्षाचे २०, काँग्रेसचे १६, राष्ट्रवादी-शपचे १० तसेच अपक्ष आणि इतर मिळून १२ असे संख्याबळ आहे. राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी पहिल्या पसंतीच्या ३७ मतांची गरज आहे. त्यामुळे भाजपचे चार, शिवसेना आणि राष्ट्रवादीचा प्रत्येकी एक तसेच महाविकास आघाडीचा एक उमेदवार निवडून जाऊ शकतो.महाराष्ट्र काँग्रेसच्या बुधवारी मुंबईत पार पडलेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत या निवडणुकीबाबत प्राथमिक चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या नावाला पसंती दिल्यास काँग्रेसकडून त्याला विरोध होऊ शकतो, अशी माहिती पक्षातील काही ज्येष्ठ नेत्याने 'महाराष्ट्र टाइम्स'ला दिली. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील राजकीय परिस्थिती लक्षात घेता राष्ट्रवादी काँग्रेसची भाजपसोबत वाढलेली जवळीक आणि त्याबाबतच्या चर्चा लक्षात घेता शरद पवारांना संधी देऊ नये, अशी मागणी काँग्रेसच्या एका गटातून केली जात आहे.

महाविकास आघाडीकडून नव्या चेहऱ्याला संधी द्यावी, असे मत अनेकांनी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस शप भाजपसोबत जाऊ शकते, अशी दाट शक्यता गेल्या काही दिवसांपासून वर्तवली जात आहे. यासोबतच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. त्यामुळे शरद पवारांना ही जागा सोडल्यास महाविकास आघाडीच्या वाट्याला येणारी एक जागाही नंतर महायुतीकडे जाऊ शकते, असे मत व्यक्त केले जात आहे.

## भाजपला झटका, नगरसेवकांचा काँग्रेसला पाठिंबा; सत्ता पेच सुटला

**ठाणे :** भिवंडी महापालिकेतील सत्ता समीकरणं अचानक बदलली आहेत. १६ जानेवारीला महापालिका निवडणुकीचा निकाल लागला. निकाल लागून महिना उलटला तरीही भिवंडीत सत्ता स्थापनेचा पेच कायम आहे. त्यातच आता शहरात मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. भाजप नगरसेवकांच्या एका गटानं काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भिवंडीत काँग्रेस आघाडीचा महापौर बसण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. काँग्रेसच्या तिरक्या चालीनं भाजपला धक्का बसला आहे. भिवंडी महानगरपालिका निवडणुकीचा निकाल गेल्या महिन्यात जाहीर झाला. मतदारांनी कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत दिलं नाही. काँग्रेसला सर्वाधिक ३० जागा मिळाल्या. भाजपनं २२ जागा जिंकल्या. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला प्रत्येकी १२ जागांवर समाधान मानावं लागलं. भिवंडी महानगरपालिकेतील एकूण सदस्यसंख्या ९० आहे. बहुमतासाठी ४६ चा आकडा गाठणं गरजेचं आहे. भाजपच्या ९ नगरसेवकांनी पाठिंबा दिल्यानं काँग्रेस आघाडीचं संख्याबळ ५० च्या पुढे गेलं आहे.काँग्रेस आणि राष्ट्रवादी शप यांचा एकत्रित आकडा ४२ पर्यंत पोहोचला. त्यांना सत्ता स्थापनेसाठी आणखी ४ नगरसेवकांचा पाठिंबा आवश्यक होता. त्यातच आता भाजपच्या २२ पैकी ९ नगरसेवकांनी काँग्रेस प्रणित भिवंडी सेक्युलर फ्रंटला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे काँग्रेस प्रणित आघाडीनं बहुमताचा आकडा गाठला आहे. येत्या दोन दिवसांत आघाडीचा महापौर बसेल, अशी शक्यता आहे. गेल्या महिन्याभरापासून भिवंडीत विविध राजकीय समीकरणांची चर्चा होती. भाजप, शिंदेसेना यांचं एकत्रित संख्याबळ ३४ पर्यंत पोहोचतं. त्यामुळे त्यांना सत्ता स्थापनेसाठी आणखी १२ जणांचा पाठिंबा गरजेचा होता. पण काँग्रेस आघाडीनं भाजपला धक्का दिला.

## आठवणी जागवल्या अन अभिनंदन केलं

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. महापालिका निवडणुकीनंतर पहिल्यांदाच या दोन्ही नेत्यांमध्ये भेट झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. राज्यात नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान या दोन्ही नेत्यांनी एकमेकांवर टीका केली होती. त्यानंतर झालेल्या या भेटीने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे हेही उपस्थित होते.उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या नंदनवन या शासकीय निवासस्थानी ही भेट झाली. यावेळी शिंदे यांनी राज ठाकरे यांचा सत्कारही केल्याचे समजते. मात्र या भेटीबाबत कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. रात्री उशिरापर्यंत या भेटीचे कारण गुलदस्त्यात ठेवण्यात आले होते. ठाकरे बंधूंच्या युतीसाठी राज यांनी महायुती आणि त्यातही एकनाथ शिंदेंसोबतच्या गाठीभेटी बंद कराव्यात, असा सूर शिवसेना उबाठाकडून आळवला गेला होता.

## ब्लॅक बॉक्स इतक्या सहज नष्ट होत नाही'; अपघातावर जय पवारांचे प्रश्न

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झालेला असतानाच, आता या प्रकरणाला एक नवे वळण मिळाले आहे. अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांनी या अपघाताच्या चौकशीबाबत अत्यंत मोठी मागणी केली आहे. विशेष म्हणजे, ज्या कंपनीच्या विमानाने हा अपघात झाला, त्या व्हीएसआर (तडठ) कंपनीवर तात्काळ बंदी घालण्याची मागणी जय पवार यांनी लावून धरली आहे.वडिलांच्या निधनानंतर जय पवार यांनी पहिल्यांदाच जाहीरपणे आपली भूमिका मांडली आहे. त्यांनी आपल्या सोशल मीडिया स्टेटसवरून या प्रकरणातील संशयास्पद बाबींवर बोट ठेवले आहे. जय पवार म्हणाले की, 'विमान अपघातात 'ब्लॅक बॉक्स' इतक्या सहजपणे नष्ट होऊ शकत नाही. महाराष्ट्रातील जनतेला त्यांच्या हृदयाला हादरवून टाकणाऱ्या या दुर्घटनेचे पारदर्शक आणि निर्विवाद सत्य जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे.' जय पवारांच्या या पोस्टमुळे हा अपघात तांत्रिक त्रुटीमुळे झाला की हा घातपात आहे, या चर्चेला पुन्हा उधाण आले आहे. ज्या व्हीएसआर कंपनीचे विमान अजित पवार यांनी वापरले होते, त्या कंपनीच्या कामकाजावर जय पवार यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. 'व्हीएसआरच्या विमान उड्डाणांवर तात्काळ बंदी घाला आणि त्यांच्या सर्व गैरव्यवहारांची सखोल व निष्पक्ष चौकशी करा,' अशी मागणी त्यांनी केली आहे. जोपर्यंत सत्य समोर येत नाही, तोपर्यंत या कंपनीला उड्डाणाची परवानगी नसावी, असाही पवित्रा जय पवारांनी घेतला आहे.काही दिवसांपूर्वीच आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन या अपघाताबाबत धक्कादायक दावे केले होते. हा अपघात नसून एक 'घातपात' असू शकतो, अशी ठाम भूमिका रोहित पवार यांनी मांडली होती. आता जय पवार यांनीही ब्लॅक बॉक्सबद्दल उपस्थित केलेले प्रश्न रोहित पवारांच्या संशयाला बळकटी देणारे ठरत आहेत.

## भाजप १०० पार, मोठी झेप घेणार; आजोबा-नातू काय करणार?

**नवी दिल्ली :** १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागा रिक्त होत आहेत. त्यासाठीच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली आहे. १६ मार्चला यासाठी मतदान होईल. या वर्षी राज्यसभेच्या २४५ पैकी ७२ जागांसाठी निवडणूक होणार आहे. पैकी ३७ जागांसाठी मार्चमध्ये मतदान होईल. या निवडणुकीनंतर वरिष्ठ सभागृहातील भाजपची ताकद वाढेल. सर्व ७२ जागांची निवडणूक झाल्यावर राज्यसभेतील एनडीएचं संख्याबळ ४० वरुन ५० वर जाईल. तर इंडिया आघाडीचं संख्याबळ कमी होईल. विविध राज्यांमधील भाजपच्या आमदारांची संख्या पाहता भाजपला ३७ ते ३८ जागा मिळू शकतात.महाराष्ट्रातील सर्वाधिक ७ जागा रिक्त होत आहेत. ओडिशा (४), तेलंगणा (२), तामिळनाडू (६), छत्तीसगड (५), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१),





बिहार (५) या राज्यांमधील राज्यसभेच्या जागादेखील रिक्त होत आहेत. शरद पवार ( राष्ट्रवादी काँग्रेस शप), अभिषेक सिंघवी (काँग्रेस), हरिवंश नारायण सिंह (जेडीयू), साकेत गोखले (तृणमूल), रामदास आठवले (आरपीआय-आठवले), प्रियंका चतुर्वेदी (शिवसेना उबाठा) यांचा कार्यकाळ एप्रिलमध्ये संपत आहे.यंदाच्या वर्षात राज्यसभेच्या ७२ सदस्यांचा कार्यकाळ संपणार आहे. या जागांसाठी निवडणूक झाल्यावर भाजपची राज्यसभेतील ताकद आणखी वाढेल. तर प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसची स्थिती कमकुवत होईल. विविध राज्यांवर नजर टाकल्यास काँग्रेसच्या मित्रपक्षांची ताकददेखील घटताना दिसते. सध्याच्या घडीला राज्यसभेत भाजपचे १०३ खासदार आहेत. तर एनडीएच्या खासदारांचा एकूण आकडा १२६ च्या घरात जातो. भाजपच्या ३० खासदारांचा कार्यकाळ संपणार आहे. भाजपचं संख्याबळ पाहता त्यांचे ३२ उमेदवार निवडून येऊ शकतात. भाजपनं जुळवाजुळव केल्यास आणखी ३ ते ४ जागांवर यश मिळू शकतं.गेल्या दशकभरात राज्यसभेतील भाजप खासदारांची संख्या सातत्यानं वाढली आहे. २०१४ मध्ये राज्यसभेत भाजपचे केवळ ५५ सदस्य होते. २०१७ मध्ये हाच आकडा ५७ वर गेला. भाजप राज्यसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरला. २०२० मध्ये सदस्य संख्या ९२ वर पोहोचली. २०२२ मध्ये भाजपनं १०० चा आकडा ओलांडला. गेल्या वर्षी हाच आकडा १०३ वर गेला. शरद पवार यांच्या राज्यसभेची टर्म २ एप्रिलला संपत आहे. त्यांना पुन्हा राज्यसभेवर पाठवण्यासाठी आवश्यक संख्याबळ त्यांच्या पक्षाकडे आहे. महाविकास आघाडीतील तीन प्रमुख पक्ष एकत्र आले आणि त्यांनी पवारांना उमेदवारी दिली तरच पवार राज्यसभेवर जाऊ शकतात. तर सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यानं त्या राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देणार आहेत. त्यांच्या जागी त्यांचे पुत्र पार्थ पवार यांना संधी दिली जाऊ शकते. पण सुनेत्रा पवारांच्या राज्यसभेचा कार्यकाळ २०२८ मध्ये संपणार आहे. त्यामुळे पार्थ पवार त्यांच्या जागी निवडून जाण्यापेक्षा रिक्त होत असलेल्या ७ जागांपैकी १ जागा लढवू शकतात. तसं झाल्यास त्यांना २०३२ पर्यंतचा कार्यकाळ मिळेल. पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याइतकं संख्याबळ राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नांदेडमध्ये सीआरएस पोर्टल हॅक अनब १,७०० लोकसंख्येच्या गावात १५,५६९ बोगस जन्म नोंदी

**नांदेड :** कंधार तालुक्यातील सावळेश्वर गावातील बनावट जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याचे कनेक्शन झारखंड असल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी उस्माननगर पोलिसांनी तपासाची चक्री फिरवत झारखंड राज्यातील पाच आरोपीना ताब्यात घेतले. आरोपीनी सीआरएस पोर्टलची युजर आयडी हॅक करून तब्बल १५ हजार ५६९ बनावट जन्म प्रमाणपत्र वाटप केले होते. पोलिसांनी सायबर सेलच्या मदतीने आणि आयपी ॲड्रेसच्या आधारे आरोपीच्या मुसक्या आवळल्या. जितेंद्र कुमारसिंह महेंद्र प्रसादसिंह, ओम प्रकाश उमेश मिश्रा, लक्ष्मी अमीतकुमार पंडित, सुमीत कुमार निर्मल सिंह आणि सतिश कुमार भवानी शाहू असे अटक करण्यात आलेल्या आरोपीची नावे आहेत. हे सर्व आरोपी झारखंड राज्यातील रांची



जिल्ह्यातील रहिवासी आहे.उस्माननगर पोलिसांनी सायबर सेलच्या मदतीने तसेच गोपनीय माहितीच्या आधारे झारखंड राज्यातील रांची जिल्हयातील गढवा येथे जाऊन वरील गुन्हयाच्या संबंधाने तपास करत संशयित आरोपीतांचा सहभाग निष्पन्न झाल्याने अटक केली. न्यायालयात हजर करून गुन्हयाचे संबंधाने पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त करण्यात आला. गुन्हयाचा पुढील तपास लोहा ठाण्याचे पोलीस निरिक्षक एन. एस. आयलाने हे करीत आहेत. दरम्यान बोगस जन्म प्रमाणपत्रांचा मोठा घोटाळा उघड झाल्याने खळबळ उडाली होती..कंधार तालुक्यातील सावळेश्वर गावाची मूळ लोकसंख्या केवळ १ हजार ७०० इतकी आहे. मे २०२५ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत तब्बल १५५६९ नावे जन्म नोंदणीमध्ये वाढवण्यात आल्याचे उघड झाले. अवव`श्रव शींशपीं या टॅबचा वापर करून (उठड) पोर्टल युजर आयडी चक२०३६२ठए च्या गैरप्रकारने ऑनलाईन पध्दतीने वापर करून १५५६९ ऑनलाईन बनावट जन्म नोंदणी करनण्यात आली. फसवणूकीचा प्रकार समजल्यानंतर उस्माननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.दरम्यान हा घोटाळा उघड झाल्यानंतर भाजप नेते किरीट सोमय्या यांनी सावळेश्वर ग्राम पंचायतीला भेट देऊन माहिती घेतली होती . त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याना भेटून कारवाईची म ागणी केली. या प्रकरणात सहा राज्यांमध्ये कार्यरत असलेली एक मोठी गँग सहभागी असल्याचा सोमय्या यांनी व्यक्त केला. उत्तर प्रदेशातील चार ठिकाणी आणि महाराष्ट्रातील सहा ठिकाणी बोगस नोंदी करून जन्म प्रमाणपत्रे मिळवण्यात आली आहेत.

ही गँग पाचहून अधिक राज्यांम ध्ये कार्यरत असून या घोटाळ्यासाठी परदेशातून आर्थिक मदत येत असल्याचा खळबळजनक आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता.

## लग्नपत्रिकेवरुन वाद उफाळला, भावकीच्या भांडणातून हळदीतच तिघांना संपवलं

**धुळे :** जिल्ह्यातील पिंपळनेर येथील नीलकंठनगर परिसरात जुन्या वादातून आणि लग्नपत्रिकेतील नावाच्या वादातून गोसावी समाजातील भाऊबंधकीमधील दोन गटांत तुफान हाणामारी झाली. या संघर्षात धारदार शस्त्राने केलेल्या हल्यात तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे धुळे जिल्हा हादरला आहे. हल्लयातील मृतांमध्ये देवेंद्र ज्ञानेश्वर पवार (वय ३५), सुरेश मोजगीर गोसावी (५५) आणि साहिल सुरेश गोसावी (वय २२) यांचा समावेश आहे. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे.पिंपळनेर शहरातील नीलकंठ- नगरमध्ये राहणारे विजय गोसावी यांच्या मुलीच्या लग्नाचा साखरपुडा आणि हळदीचा कार्यक्रम गुरुवारी दुपारच्या सुमारास सुरू होता. सर्व नातेवाईक एकत्र जमले होते. मात्र, दुपारी अचानक दोन गट आमनेसामने आले. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. रागाच्या भरात हल्लेखोरांनी कुऱ्हाड आणि चाकूसारख्या धारदार शस्त्रांनी समोरच्या व्यक्तींवर सपासप वार करण्यास सुरुवात केली. मंडपात रक्ताचा सडा पडला.हल्ल्यात गंभीर



जखमी झालेले देवेंद्र पवार, सुरेश गोसावी आणि साहिल गोसावी यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान या तिघांचाही मृत्यू झाला. पंकज अशोकगीर गोसावी, सुरेश सुपडूगीर गोसावी आणि सागर गोसावी गंभीर जखमी असून, यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे.या घटनेनंतर पिंपळनेर पोलिसांनी तीन आरोपींना ओटाबारी येथे अटक केली. कांतीलाल गोसावी, जयंत गोसावी आणि ब्रिझा कारचा चालक (सर्व रा. गुजरात) अशी त्यांची नावे आहेत. या प्रकरणी कानागिरी गोसावी, यशवंत गोसावी, अनिलगिरी गोसावी, सोनुगिरी गोसावी आदींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हा हल्ला पूर्वनियोजित असल्याचा आरोप मृतांच्या नातेवाइकांनी केला आहे.

## अंगणात खेळणाऱ्या चिमुकलीवर अत्याचार

**पुणे :** घरासमोर खेळत असलेल्या एका आठ वर्षीय चिमुरडीवर गावातीलच एका अल्पवयीन मुलाने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात असणाऱ्या कान्हूर मेसाई या गावात उघडकीस आली. या प्रकरणी शिक्रापूर पोलिसांनी संशयित अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतलं असून, त्याच्यावर बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) आणि भारतीय दंड संहितेनुसार बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पीडित बालिका घरासमोर खेळत होती. ती घरात एकटी असल्याचे पाहून संशयित आरोपी तिथे आला आणि त्याने या चिमुकलीवर अत्याचार केला. घडलेल्या प्रकाराबाबत कोणालाही न सांगण्याची धमकी देऊन तो तेथून पसार झाला. मात्र, सायंकाळी बालिकेला ताप येऊन प्रकृती बिघडल्याने पालकांनी तिला उपचारांसाठी तातडीने रुग्णालयात दाखल केलं. यावेळी तिच्यावर बलात्कार झाल्याचे तपासणीकरताना डॉक्टरांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी ही बाब पालकांना सांगितली. धक्का बसलेल्या पालकांनी मुलीला विश्वासात घेऊन विचारपूस केली.

## विवाहितेने दोन चिमुकल्यांसह विष प्राशन केलं की दिलं ? २ जणांचा मृत्यू

**धुळे :** धुळ्यामधील एका प्रकरणाने सर्वांच्या काळजाचा ठोका चुकवला आहे. या घटनेमध्ये आईने पोटच्या दोन चिमुकल्यांना विष दिल्याचे सांगितले जाते आहे. पण कोणतीही आई असं का करेन हा एक मोठा प्रश्न आहे. स्वतःच्या जीवापेक्षा जास्त मुलांना जीव लावणारी आई असते. आई ही अशी माऊली असते जी संकटकाळात स्वतः जीवानिशी जायला तयार असते पण स्वतःच्या मुलांवर कोणतेच सावट येऊ देत नाही. त्यामुळे आता या प्रकरणी या आईने विष दिले की तिच्यासह तिच्या मुलांनाही कोणाकडून तरी विष दिले गेले आहे, हा संशय नागरिकांमधून व्यक्त होतो आहे. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील आंबे ग्रामपंचायत हद्दीतील भिलटदेव पाडा येथे मन हेलावून टाकणारी एक दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. येथील आरती संजय पावरा (वय ३०) या विवाहितेने आपल्या दोन चिमुकल्या मुलांसह विषारी औषध प्राशन केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेत विवाहिता आरती आणि तिचा तीन वर्षीय मुलगा चिराग यांचा मृत्यू झाला आहे, तर पाच वर्षीय मोठा मुलगा रिहांश याची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. रिहांश सध्या मृत्यूशी झुंज देत असून, त्याच्यावर धुळे येथील जिल्हा रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. एकाच वेळी आई आणि मुलाचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहेदरम्यान, ही घटना उघडकीस आल्यानंतर शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती. प्राथमिक तपासात ही घटना संशयास्पद वाटत असून, ही सामूहिक आत्महत्या आहे की हत्या? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मयत विवाहितेच्या माहेरच्या नातेवाईकांनी संबंधित पतीची ही सातवी पत्नी असून यापूर्वी तिघा पत्नींची देखील अशाच प्रकारे हत्या करण्यात आली असल्याचा पतीवर गंभीर आरोप केला आहे.या घटनेची दखल घेत शिरपूर पोलिसांनी वेगाने तपास सुरू केला असून, संशयित पतीला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस आता शवविच्छेदन अहवाल आणि नातेवाईकांच्या जबाबाच्या आधारे या मृत्यूचे गूढ उकलण्याचा प्रयत्न करत आहेत.

# बुधवार पेठेत पुन्हा छापा, ११ बांग्लादेशी ताब्यात, सहा जणांची कबुली

**पुणे :** बुधवार पेठ परिसरातील फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी मोठी कारवाई केली. या कारवाईत संशयित २२ महिलांना ताब्यात घेण्यात आले असून त्यापैकी ११ महिला बांगलादेशी नागरिक असल्याचं प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.खडक आणि फरासखाना पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. संबंधित वेश्यागृहावर अचानक छापा टाकून महिलांना ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या २२ महिलांपैकी ११ महिलांनी भारतीय नागरिक असल्याचे ओळखपत्र सादर केले. त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करून त्याची पडताळणी करण्यात आली



आहे. उर्वरित ११ महिलांपैकी ६ महिलांनी चौकशीत आपण बांगलादेशी नागरिक असल्याची कबुली दिली. उर्वरित ५ महिलांची कागदपत्रे तपासल्यानंतर त्या देखील बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले आहे.पोलिसांनी संबंधित वेश्यागृह सील करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मानव तस्करी आणि बेकायदेशीर वेश्याव्यवसायाविरोधात अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणी पुढील तपास सुरू असून संबंधित महिलांची नागरिकत्व स्थिती, त्यांना येथे आणणारी टोळी, दलालांची भूमिका आणि आर्थिक व्यवहार याबाबत अधिक तपास केला जात आहे. तसेच परदेशी नागरिकांच्या बेकायदा वास्तव्यासंबंधी संबंधित विभागांनाही माहिती देण्यात येणार आहे.पुणे पोलिसांनी नुकतेच बुधवार पेठेत 'कोम्बिंग ऑपरेशन' केले होते. त्यावेळी बुधवार पेठ परिसरातील सर्व रस्ते बंद करून पोलिसांनी प्रत्येक इमारतीत झडती घेतली होती. त्यावेळी पोलिसांनी काही अल्पवयीन मुली ताब्यात घेतल्या होत्या. तर एक बांगलादेशी म हिलेला अटक केली होती. मात्र, त्यानंतर पाच ते सहा दिवसांतच मोठ्या संख्येने बांगलादेशी महिला सापडल्या आहेत. त्यामुळे पोलिसांनी गेल्या आठवड्यात ३९ कुंटणखाने, ७०० व्यक्तींच्या घेतलेल्या झडतीत, पोलिसांच्या हाती काही लागले नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.बांगलादेशी महिला सापडलेल्या कुंटणखान्याच्या इमारतीत अनेक कुंटणखाने चालविले जातात. ही संपूर्ण इमारत सील करण्याबाबत कार्यवाही केली जात आहे, अशी माहिती अमितेशकुमार यांनी दिली.

# नेदरलँड्सवर टीम इंडियाचा विजयी 'चौकार'

## १७ धावांनी विजय : सुपर-८ मध्ये आफ्रिकेचे आव्हान..







**संक्षिप्त धावफलक**

- **भारत :** २० षटकांत ६ बाद १९३ (तिलक वर्मा ३१, सूर्यकुमार यादव ३४, शिवम दुबे ३१ चेंडूत ६६, हार्दिक पंड्या ३०, लॉगन बीक ३-५६, आर्यन दत्त २-१९ बळी)
- **नेदरलँड्स :** २० षटकांत ७ बाद १७६ (बास डी लिडे ३३, लेविट २४, लायन कॅचेट २६, कॉलिन एकरमन २३, वरुण चक्रवर्ती ३-१४, शिवम दुबे २-३५).

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** सूर्यकुमार यादवच्या कल्पक नेतृत्वाखाली भारतीय संघाने आपला विजयी रथ कायम राखला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारताने नेदरलँड्सचा १७ धावांनी पराभव केला. या विजयासह टीम इंडियाने साखळी फेरीत ४ पैकी ४ सामने जिंकून आपली अपराजित मोहीम दिमाखात सुरू ठेवली आहे. टी-२० विश्वचषकमधील भारताचा सलग १२ वा विजय आहे.

भारतीय संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना १९३ धावा करत नेदरलँड्ससमोर १९४ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना नेदरलँड्सचा संघ निर्धारित २० षटकात ७ विकेट्सच्या मोबदल्यात १७६ धावांपर्यंतच मजल मारू शकला. अष्टपैलू खेळी साकारणाऱ्या शिवम दुबेला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

टीम इंडियाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अभिषेक शर्मा आणि इशान किशन मैदानात उतरले. मात्र अभिषेक पुन्हा एकदा दुर्दैवी ठरला. सामन्याच्या पहिल्याच षटकात तो शून्यावर बाद झाला. त्याने अवघ्या ३ चेंडूचा सामना केला आणि या विश्वचषकात त्याची शून्यावर बाद होण्याची हॅट्रिकच पूर्ण झाली. यानंतर इशान किशनने आक्रमक सुरुवात करत १८ धावा झटपट केल्या, पण तोही जास्त वेळ टिकू शकला नाही. एका टप्प्यावर तिलक वर्मा (३१) आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी डाव सावरला. मात्र नेदरलँड्सच्या क्षेत्ररक्षकाने अप्रतिम कॅच घेत तिलकला माघारी धाडले. त्यानंतर सूर्यकुमारही २८ चेंडूत ३४ धावा करून बाद झाला आणि भारताचा स्कोअर ४ बाद ११० असा झाला.

शेवटच्या काही षटकांत शिवम दुबे आणि हार्दिक पंड्या यांनी तुफानी फटकेबाजी केली. शिवम दुबेने ३१ चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकारांसह ६६ धावांची झंझावाती खेळी केली, तर हार्दिकने २१ चेंडूत ३० धावा जोडल्या. या दोघांनी ७६ धावांची भागीदारी केली. मात्र अखेरच्या षटकात दोघेही बाद झाल्याने भारताला २०० धावांचा आकडा गाठता आला नाही. रिंकू सिंग ६ धावांवर नाबाद राहिला. भारताने शेवटच्या पाच षटकांत ७५ धावांची बरसात केली. १९४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लिंबू-टिंबू समजल्या जाणाऱ्या नेदरलँड्सने सर्वांनाच चकित केले. सलामीपासूनच त्यांनी भारतीय गोलंदाजांचा धैर्याने सामना केला. नेदरलँड्सने २० षटकांत ७ गडी गमावून १७६ धावा केल्या. बास डी लिडेने सर्वाधिक ३३ धावांचे योगदान दिले तर ओडाऊड २०, मायकेल लेविट २४, तर लायन कॅचेटने २६ धावा फटकावल्या. विशेष म्हणजे, नेदरलँड्सच्या फलंदाजांनी खेळाच्या प्रत्येक षटकात धावगती राखण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे सामना शेवटच्या षटकापर्यंत लांबला. भारताकडून वरुण चक्रवर्तीने ३, शिवम दुबेने २, जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पंड्या यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# द.आफ्रिकेचा युएईवर विजय



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बुधवारी येथे टी-२० विश्वचषकातील दक्षिण आफ्रिकेने शेवटच्या गट साखळी सामन्यांत संयुक्त अरब अमिरातविरुद्ध सहा विकेटने विजय मिळवला. १२ धावांत ३ बळी टिपणारा कॉर्बिन बॉश सामनावीरचा मानकरी ठरला.

१२३ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना द. आफ्रिकेने १३.१ षटकांत विजय मिळिवला. एडन मार्करमने ११ चेंडूत २८ धावा काढल्या तर ब्रेव्हिसने २५ चेंडूत ३६ धावा फटकावल्या. रायन रिकेल्टनने काही आकर्षक षटकार मारत १६ चेंडूत ३० धावा झोडपल्या. रविवारी दक्षिण आफ्रिकेचा सुपरएट फेरीचा सामना भारताविरुद्ध होणार आहे. ब्रेव्हिसने या छोटेखानी डावात काही अप्रतिम षटकार मारले. तत्पूर्वी अलिशान शराफूने दोन जीवदानाचा लाभ घेतला. परंतु स्पर्धेतील पहिला सामना खेळणाऱ्या ॲन्रिच नॉर्त्जे ने जलद आणि भेदक गोलंदाजी करुन युएईला निर्धारित २० षटकांत ६ बाद १२२ धावांवर रोखले. लुंगी एन्गिडी आणि मार्को जान्सेन यांना या सामन्यात विश्रांती देण्यात आली होती. नॉर्त्जे (२८ धावांत २ बळी) आणि कॉर्बिन बॉश (१२ धावांत ३ बळी) यांनी सातत्याने शॉर्ट आणि जलद गोलंदाजी केली. त्यांच्या माऱ्यापुढे यूएईच्या फलंदाजांना प्रतिकार करता आला नाही. शराफूने ३८ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकारासह ४५ धावा केल्या. ढगाळ वातावरण व फ्लडलाईट्सचा विचार करून मार्करमने नाणेफेक जिंकल्यानंतर प्रथम गोलंदाजी घेतली. कर्णधार मुहम्मद वासीम (१२ चेंडूत २२) व आर्यांश शर्मा यांनी थोडाफार प्रतिकार करीत काही चौकार मिळिवले. पण जॉर्ज लिन्डेने पहिला बळी मिळिवताना वासीमला बाद केले. यूएईच्या इतर फलंदाजांना आक्रमक फटकेबाजी करणे जमले नाही. कॅनडा व अफगाणविरुद्ध अर्धशतके झळकवणारा सोहेब खानला बॉशचा चेंडू कळला नाही आणि त्याने यष्टिरक्षकाकडे झेल दिला. यूएईच्या फलंदाजांनी आपल्या डावात फक्त १० चौकार मारता आले. त्यापैकी ९ वासीम व शराफू यांनी मारले होते. त्यांचा डाव संपल्यानंतर पावसाच्या हलक्या सरी सुरू झाल्याने खेळपट्टीवर कव्हर्स घालण्यात आले होते.

# नामिबियाला नमवत पाकिस्तान सुपर-८ मध्ये




**कोलंबो/वृत्तसंस्था :** साहिबजादा फरहान : नाबाद १०० धावा येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर बुधवारी झालेल्या सामन्यात पाकिस्तानने लिंबू टिंबू असलेल्या नामिबियाचा १०२ धावांनी पराभव केला. या विजयासह पाकचा संघ टॉप ८ मध्ये पोहोचणारा आठवा संघ ठरला आहे. ग्रुप अ सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ३ बाद १९९ धावा केल्या. प्रत्युत्तरात नामिबियाचा संघ १७.३ षटकांत ९७ धावांवर सर्वबाद झाला.

रविवारी पारंपरिक प्रतिस्पर्धी भारताकडून झालेल्या पराभवानंतर पाकिस्तानने या सामन्यात जोरदार पुनरागमन केले. सईम आयुब १४ धावा करुन बाद झाला. यानंतर कर्णधार सलमान आगा (३८) आणि फरहान यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६७ धावांची भागीदारी केली. त्यानंतर फरहान आणि शादाब खान (नाबाद ३६) यांनी ८१ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत संघाचा डाव सावरला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानची सुरुवात सावध होती. साइम अयूब (१४) बाद झाल्यानंतर पॉवरप्लेमध्ये केवळ ४७ धावा झाल्या. मात्र नवव्या षटकात सलमान आगाने विलेम मायबर्गच्या गोलंदाजीवर सलग षटकार ठोकत गती वाढवली. त्यानंतर फरहाननेही लेग-स्पिनरवर आक्रमक फटकेबाजी करत डावाला वेग दिला. एका षटकात तीन षटकार ठोकत पाकिस्तानने धावगती वाढवली. सलमान बाद झाल्यानंतरही फरहानने संयम आणि आक्रमकतेचा सुरेख मिलाफ साधत नामिबियाच्या गोलंदाजांवर दबाव कायम ठेवला आणि शतक पूर्ण केले. अखेरीस शादाब खानने शेवटच्या षटकांत दोन षटकार ठोकत १९९ धावांचा भक्कम आकडा उभा केला.

२०० धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना नामिबियाची फलंदाजी पूर्णपणे कोलमडली. पाकच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर त्यांचा संपूर्ण संघ अवघ्या ९७ धावांत गारद झाला आणि पाकिस्तानने १०२ धावांनी दणदणीत विजय साजरा केला. नामिबियाकडून लॉरेन स्टीनकॅम्पने सर्वाधिक २३ धावांची खेळी केली. तर इतर कुठल्याही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. इतर फलंदाज ठराविक अंतराने बाद होत गेल्याने नामिबियाला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले.

# नेपाळला नमवून भारतीय महिला उपांत्य फेरीत



**बँकॉक/वृत्तसंस्था :** एसीसी महिला आशिया चषक रायझिंग स्टार्स स्पर्धेच्या गट 'अ' सामन्यात भारताने नेपाळवर सात गड्यांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले. या विजयासह भारताने गट 'अ'मध्ये तीन सामन्यांमध्ये आपला दुसरा विजय नोंदवला. भारताने दोन विजय आणि एक पराभवासह चार गुण मिळवून गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. या सामन्यात तनुजा कंवरला तिच्या शानदार गोलंदाजी कामगिरीसाठी सामनावीर घोषित करण्यात आले.

प्रथम फलंदाजी करताना नेपाळला १८ षटकांत फक्त ७८ धावांत गुंडाळण्यात आले. सलामीवीर बिंदू रावल (२१ चेंडूत ११, दोन चौकारांसह) आणि समझाना खडका (१६ चेंडूत २२, चार चौकारांसह) या त्यांच्या चांगल्या सुऊवातीचे रूपांतर करण्यात अपयशी ठरल्या. कर्णधार पूजा महातो (१४ चेंडूत १० धावा, एका चौकारासह), यष्टीरक्षक-फलंदाज ऊबी पोद्दार (नऊ चेंडूत १२ धावा, दोन चौकारांसह) आणि कविता जोशी (१७ चेंडूत १२ धावा, दोन चौकारांसह) यांनीही फलंदाजीत निराशाजनक कामगिरी केली. भारताकडून मिन्नू मणी (३/८), कर्णधार राधा यादव (२/१७) आणि तनुजा कंवर (४/१२) यांनी गोलंदाजीत उत्कृष्ट कामगिरी केली. ७९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सलामीवीर वृंदा दिनेशने १८ चेंडूत नाबाद ३९ धावा केल्या आणि नऊ चौकार फटकावले. भारताने ७.५ षटकांत लक्ष्य गाठले. तिच्याशिवाय अनुष्का शर्मा (दोन चौकारांसह १० धावा) आणि तेजल हसबनीस (१३ चेंडूत १८ धावा, तीन चौकारांसह) यांनीही फलंदाजीत योगदान दिले.

# विशालने केली हद्द पार; रुचितानं दिली सक्त ताकीद, म्हणाली, 'माझ्या आई-बाबांना..'

**मुंबई :** बिग बॉस मराठी ६ 'च्या आजच्या भागात दीपाली, तन्वी आणि सचिन यांच्यामध्ये कॅप्टन्सी टास्क होतो. सचिन रुचिताला निवडतो, दीपाली राकेशला निवडते आणि तन्वी प्रभूला निवडते. सचिनला पहिली चावी सापडते. सचिन दरबारात असलेली मोठ्या साखळीचं एक कुलूप उघडतो. सचिन पहिली फेरी जिंकतो. दुसऱ्या फेरीत तन्वी जिंकते. सचिनची तब्येत बिघडते त्यामुळे त्याच्याजागी प्राजक्ता खेळते. तिसऱ्या फेरीत तन्वी जिंकते. चौथ्या फेरीत तन्वी जिंकते. तीन फेऱ्या जिंकल्यामुळे, तन्वी बिग बॉसच्या घराची कॅप्टन होते.रुचिता चिडचिड करते. पण, विशाल तिला समजावतो. राखी आणि राकेश रुचिताविरुद्ध प्लॅन करतात. रुचिता आणि विशाल बोलत असतात. तेव्हा विशाल रुचिताला म्हणतो, 'माझे ओठ किती सेक्सी दिसतायत, किस नाही



केलं बरेच दिवस' पुढे रुचिता विशालला म्हणते, 'मला फक्त एवढंच म्हणायचंय माझ्या आई-बाबांना नाही आवडणार. मी जेव्हा तुला बोलेन शांत बस, तेव्हा तू नको बोलूस. हेच मला तुला समजवायचं आहे. कारण एक्सेप्टन्सपर्यंत मी कशी तरी हँडल करेन पण, ओव्हर द बोर्ड जातंय ना. मला ते नकोय.' अनुश्री रुचिताला समजावते.दुसऱ्यादिवशी सकाळी, राकेश रुचिताला आपल्याबाजूने करण्याचा प्रयत्न करतो. त्यावर रुचिता म्हणते, 'मला विशालच्या विरुद्ध जाता नाही येणार.' विशाल टास्कवरून नाराज होतो. पुढे, विशाल रुचिताला म्हणतो, 'मला असं वाटतं अनुश्री जेलस फील होते' अनुश्री प्राजक्ताला म्हणते, 'मला त्यांच्या गोष्टी त्रास देतायत.' रुचिता विशालला म्हणते, 'तू बोल तिच्यासोबत' प्राजक्ता, विशाल, रुचिता आणि अनुश्री नॉमिनेशन टास्कबद्दल चर्चा करतात. रुचिता आणि विशालचा अनुश्रीवरचा विश्वास उडतो.बिग बॉस विशाल आणि रुचिताची मस्करी करतात. दीपाली तन्वी आणि राकेशला म्हणते, 'विशाल बाहेर काय आहे, मला माहित आहे. मी त्याच्यासोबत पूर्ण सिरीयल केली आहे. मला फक्त इथे काही बोलायचं नाही' रुचिता बेडवर नुसतीच झोपलेली असते. तन्वी तिच्या कानात जाऊन ओरडते. प्रभू बर्फ घेऊन येतो. रुचिता तो बर्फ फेकते. तन्वी, दुसरा बर्फ घेऊन येते. तरी रुचिता उठत नाही. रुचिता तोसुद्धा बर्फ फेकून देते. रुचिता तन्वीला म्हणते, 'तुझ्यासारखे ५६ बघितले, मला काही फरक नाही पडत' रुचिता चप्पल घालून बेडवर झोपते. त्यावरून तन्वी रुचिताला सुनावते. तन्वी, स्वतः रुचिताची चप्पल काढते. पुढे, सगळ्यांची बाचाबाची होते. प्रभू, विशालने वर पाय ठेवलाय म्हणून त्याचा पाय खेचतो. त्यामुळे, विशाल प्रभूला हात लावून बाजूला करतो. त्यावर तन्वी म्हणते, विशालने प्रभूला खेचलं. विशाल, प्रभू आणि तन्वीमध्ये शाब्दिक चकमक होते. बिग बॉस दोन टीम करतात आणि प्रत्येक टीममधील टॉप २ किंवा आणि फ्लॉप २ सदस्य निवडायला सांगतात. प्रभू, रुचिता, तन्वी, प्राजक्ता, राकेश आणि सागर एका टीममध्ये असतात. विशाल, राखी, अनुश्री, दीपाली, सचिन आणि रोशन दुसऱ्या टीमम ध्ये असतात. टॉप २ स्पर्धकांचा फायदा होणार असं बिग बॉस सांगतात.

## माझा विश्वासघात, एकाच अटीवर गोविंदाला मिळेल माफी..; पत्नी सुनीता अहुजा काय म्हणाली?

**मुंबई :** अभिनेता गोविंदा आणि सुनीता अहुजा यांच्या वैवाहिक आयुष्यात बऱ्याच समस्या आहेत. गेल्या काही महिन्यांपासून त्यांचे कौटुंबिक वाद चव्हाट्यावर आले आहेत. सुनीताने गोविंदावर विवाहबाह्य संबंधाचा आरोप केला होता. तर गोविंदाने तिचे हे सर्व आरोप फ ेटाळले होते. त्यानंतर आता सुनीताने पुन्हा एकदा व्लॉग पोस्ट केला असून त्यात गोविंदाविषयी मोकळेपणे व्यक्त झाली आहे. ङ्गअनेकांनी म ाझ्या निरागसतेचा फायदा उचलला आहे. मी खूप काही सहन केलंय, परंतु आता आणखी



सहन करणार नाही. मी आता स्वत:ची ओळख बनवली आहे. ४० वर्षांचं नातं रातोरात तुटत नाही. त्यामुळे मी थोडी भावूक असेनच. परंतु आता माझं मन मजबूत बनलंयङ्घ, असं सुनीता म्हणाली.याविषयी ती पुढे म्हणाली, ङ्गमी नेहमी खरं तेच बोलते. मी प्रत्येक महिलेला सांगते की तिने आपल्या अधिकारांसाठी लढायला हवं. जेव्हा माझ्या सासरची मंडळी जवळ होती, तेव्हा मी गप्प होते. कारण मी त्यांचा खूप आदर करायची. परंतु आता गोविंदा आणि मी मित्र आहोत, तर का गप्प राहून मी त्यांचं ऐकत बसू किंवा घाबरून राहू. गोविंदा हे माझं बालपणीचं प्रेम आहे. जर तो बदलला आणि माझ्या नियमांनुसार जगू लागला, तर मी त्याला माफ करेन. माझ्याबद्दल दररोज बातम्यांमध्ये जे येतं, त्याकडे मी लक्ष देत नाही. इतका ताण झेलण्याचं माझं हे वय नाही. मी मेनोपॉजचा सामना करतेय. तो हसून या गोष्टीला टाळतो. आम्हाला त्यांची उत्तरं सम जत नाहीत. गोविंदा त्याच्या आईला घाबरत होता. त्यांच्या निधनानंतर तो आता बेफिकिर झाला आहे. आता तो कोणालाच घाबरत नाही आणि त्याच्या मनासारखा वागतो. त्यांची संगत चांगली नाही. मी याआधीही म्हटलं होतं की, जर त्याचं कोणाशी अफेअर असेल तर काय झालं? मात्र प्रत्येक गोष्टीचं एक वय असतं. तरुणपणीही खूप पार्ट्या केल्या आणि आयुष्याचा आनंद घेतला, परंतु प्रत्येक गोष्टीसाठी एक वय असतं, अशा शब्दांत सुनीताने नाराजी व्यक्त केली.

## शिवजयंतीनिमित्त रितेश देशमुखच्या 'राजा शिवाजी' चित्रपटाची दमदार झलक समोर

**मुंबई :** इतिहासातील जाज्वल्यमान नाव म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. स्वराज्य स्थापनेचा तो विलक्षण प्रवास आणि महाराजांचे उत्तुंग व्यक्तिमत्व पुन्हा एकदा एका भव्य स्वरूपात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित, 'राजा शिवाजी' या द्विभाषिक (मराठी आणि हिंदी) चित्रपटाचे अधिकृत पोस्टर आज शिवाजी जयंती दिनी प्रदर्शित करण्यात आले. इतिहास साक्षी आहे त्या अढळ निष्ठेचा आणि अजेय शौर्याचा. एक अशी गाथा, जी केवळ कथा नाही तर आहे 'एक वचन, एक स्वराज्य, एक संपूर्ण राष्ट्राचा अभिमान'. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या पोस्टरमध्ये अभिनेते-दिग्दर्शक रितेश विलासराव देशमुख हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपात अत्यंत प्रभावशाली दिसत आहेत. त्यांच्या हातात फडकणारा भगवा ध्वज, चेहऱ्यावरील करारी भाव आणि युद्धाच्या पार्श्वभूमीवर उभे असलेले त्यांचे व्यक्तिमत्व महाराजांच्या शौर्याची प्रचिती देते. पोस्टरमधील सुवर्ण अक्षरातील चित्रपटाचे नाव आणि तेजस्वी प्रकाशयोजना या ऐतिहासिक गाथेच्या भव्यतेची साक्ष देते. राजा शिवाजी हा भव्य ऐतिहासिक अ‍ॅक्शन-ड्रामा, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि दूरदृष्टीला मनःपूर्वक वंदन करणारी सिनेमॅटिक कलाकृती आहे.

***

## मी बिग बॉसमध्ये गेले तर, एकतर कोणाला मारेन तरी किंवा...' अमृता खानविलकरचं वक्तव्य चर्चेत



**मुंबई :** सध्या सर्वत्र बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाची चर्चा सुरू आहे. या पर्वातील अनेक सदस्य कायम कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. बिग बॉसमध्ये जाण्यासाठी अनेक कलाकार उत्सुक असतात. बिग बॉस असा एक शो आहे ज्यामध्ये कलाकारांना स्वतःची खरी ओळख, व्यक्तिमत्व प्रेक्षकांना दाखवण्याची संधी मिळते. प्रत्येक सीझनमध्ये अनेक अभिनेते, अभिनेत्री, सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर सहभागी होतात. बिग बीसमुळे अनेक कलाकारांचं नशीब उजळलं आहे, त्यांना नंतर सिनेमे, मालिका मिळाल्या. अशातच आता एका मुलाखतीमध्ये अमृता खानविलकरनेही बिग बॉसमध्ये जाण्याबाबत भाष्य केलं आहे.अमृताने काही दिवसांपूर्वी 'फिल्मिज्ञान'ला मुलाखत दिलेली, या मुलाखतीमध्ये अमृताला बिग बॉसमध्ये जाण्याबद्दल विचारण्यात आलं. त्यावर अमृता म्हणाली की, 'मी इतर सगळे रिॲलिटी शो केले आहेत. मला घरातून फक्त या शोमध्ये जाण्यासाठी नकार आहे. त्यांना असं वाटतं की मी जर बिग बॉसमध्ये गेले तर, एकतर कोणाला तरी मारेन तरी किंवा मार खाऊन तरी येईन.''मी तर कोणाकडून मार खाऊन घेणार नाही, हे तर खरं आहे. पण मला हे करायचं नाही. काही गोष्टी या पडद्यामागेच चांगल्या असतात.' असं अमृताने पुढे सांगितलं.दरम्यान, अमृता खानविलकरच्या कामाबद्दल सांगायचं तर सध्या ती 'तस्करी' या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. या वेब सीरिजमध्ये अमृता खानविलकरसोबत इम्रान हाश्मी मुख्य भूमिकेत आहे. ही वेब सीरिज नेटफ्लिक्सवर प्रदर्शित करण्यात आली आहे. त्याचबरोबर बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाबद्दल सांगायचं तर, या पर्वातून राधा पाटील, ओंकार राऊत, करण सोनावणे आणि आयुष संजीव हे सदस्य एलिमिनेट झाले असून आता बिग बॉसच्या घरात दीपाली सय्यद, सागर कारंडे, राकेश बापट, रोशन भजनकर, रुचिता जामदार, अनुश्री माने, प्राजक्ता शुक्रे, तन्वी कोलते, प्रभू शेळके, विशाल कोटियन आणि राखी सावंत हे सदस्य आहेत. आता बिग बॉसच्या घरात वाईल्ड कार्ड एन्ट्री कोणाची होणार? हे पाहणं उत्सुकतेचं ठरणार आहे.

***

# जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते शेतकरी प्रबोधन कार्यशाळेचे उत्साहात उद्घाटन

जनसंचलन/बुलढाणा

शेतकऱ्यांनी आता केवळ पारंपारिक पिकांवर अवलंबून न राहता शाश्वत शेती आणि जोडधंद्यांकडे वळले पाहिजे. बिजोत्पादन, फळबागा आणि भाजीपाला उत्पादनातून शेतकरी आपली आर्थिक प्रगती निश्चितच साधू शकतात, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. चिखली येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित शेतकरी प्रबोधन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र आणि शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात बोलताना हर्षवर्धन देशमुख यांनी जिल्हाधिकारी किरण




पाटील यांच्या कार्याचा गौरव केला. जिल्ह्याचा प्रमुख जर शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारा असेल, तर तो जिल्हा सर्व स्तरावर प्रगती करतो. जिल्हाधिकाऱ्यांनी सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्तता करून त्यांना जमिनीचे पट्टे मिळवून दिले, हे कार्य समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे,ङ्क्ष असे ते म्हणाले. याप्रसंगी जिल्हाधिकाऱ्यांचा शाल व सन्मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी देशाचे पहिले कृषिमंत्री म्हणून मांडलेली धोरणे आजही शेतीसाठी तितकीच उपयुक्त असल्याचेही देशमुख यांनी नमूद केले. या कार्यशाळेच्या निमित्ताने शेती उत्पादित धान्य, फळे आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते, ज्याला शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. प्रमोद पडोळे यांनी, तर सूत्रसंचालन गणेश मालटे यांनी केले. याप्रसंगी जिल्हा कृषी अधीक्षक संतोष डाबरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अमोल झापे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# गंभीर रुग्णांसाठी जिल्ह्यात पॅलिअटिव्ह केअर सेवेचा प्रारंभ


जनसंचलन/बुलढाणा

: गंभीर व दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त रुग्णांना दिलासा देण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यात पॅलिअटिव्ह केअर ( ) सेवेचा प्रारंभ करण्यात आला आहे. असाध्य व जीवघेण्या आजारांमुळे त्रस्त रुग्णांना औषधोपचारासोबतच समुपदेशन, मानसिक आधार व सामाजिक सहाय्य उपलब्ध करून देणे हा या सेवेचा मुख्य उद्देश आहे. पॅलिअटिव्ह केअर अंतर्गत कर्करोग, किडनी किंवा यकृत निकामी, अर्धांगवायू, दीर्घकालीन श्वसन विकार तसेच इतर असाध्य आजारांनी ग्रस्त रुग्णांना वेदना नियंत्रण, लक्षणांवर उपचार, मानसिक मार्गदर्शन आणि कुटुंबीयांना समुपदेशन करण्यात येणार आहे. ही सेवा जिल्हा रुग्णालय, बुलढाणा तसेच ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि आशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून रुग्णांच्या घरी भेट देऊनही सेवा पुरविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गंभीर रुग्णांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांच्या वेदना कमी करण्यासाठी पॅलिअटिव्ह केअर सेवा अत्यंत महत्त्वाची आहे. या सेवेचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांनी सांगितले. तर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनीही या उपक्रमाबाबत समाधान व्यक्त करत सांगितले की, जिल्हा रुग्णालय व सर्व अधिनस्त आरोग्य संस्थांमार्फत गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पात्र रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात बाळशास्त्री जांभेकर जयंती साजरी

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसीलदार हुशारी केसकर, संजीवनी मुफडे तसेच जिल्हा नाझर गजानन मोतेकर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या समाजप्रबोधन, शिक्षण व पत्रकारितेतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. कार्यक्रमास अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.




# हिंद दी चादर शहीदी समागम सोहळा जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी दाखवला चित्ररथाला झेंडा

जनसंचलन/बुलढाणा

शीख धर्माचे नववे गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम सोहळ्यानिमित्त हिंद दी चादर अंतर्गत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग जिल्ह्यात जनजागृती अभियानास उत्साहात प्रारंभ झाला आहे. खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत होणाऱ्या भव्य समागम सोहळ्याच्या निमित्ताने जिल्ह्यात दाखल झालेल्या चित्ररथाला आज जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी झेंडा दाखवून अभियानाचा शुभारंभ केला. या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी शुभांगी साठे, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्रीपाद दामले, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, तहसीलदार चैताली सावंत, कोल्हापूर जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी फारुक बागवान, नायब तहसीलदार प्रदीप पवार, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक गणेश हुक्केरी तसेच जिल्हास्तरीय



समितीचे सदस्य उपस्थित होते. चित्ररथांच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध तालुके, शहर व ग्रामीण भागांत जाऊन ङ्गहिंद दी चादरफ या उपाधीने सन्मानित गुरू तेग बहादूर साहिब यांच्या त्याग, शौर्य, धार्मिक सहिष्णुता आणि मानवतेच्या संदेशाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. गुरु तेग बहादूर यांच्या कार्यावर आधारित ध्वनीचित्रफितीद्वारे समाजातील सर्व घटकांमध्ये जागृती निर्माण केली जाणार आहे. जिल्हाधिकारी श्रीमती धोडमिसे यांनी यावेळी सांगितले की, ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त जिल्ह्यात विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. चित्ररथ हे त्यातील महत्त्वाचे माध्यम असून, समाजात एकात्मता, बंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश पोहोचविणे हा या अभियानाचा उद्देश आहे. समागम सोहळ्यासाठी जाणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन सुरू केले आहे. वाहतूक, निवास, आरोग्य व सुरक्षा व्यवस्थेबाबत नियमित आढावा बैठका घेऊन तयारीचे सूक्ष्म नियाजन केले जात आहे. खारघर, नवी मुंबई येथे होणारा हा समागम सोहळा राज्यस्तरावर मोठ्या प्रमाणावर आयोजित केला जाणार असून, त्यासाठी विविध विभाग समन्वयाने काम करत आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी या जनजागृती अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद देत समागम सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले.

# नऊ वर्षांच्या चिमुकलीचा रमजानचा पहिला उपवास देशात सामाजिक सलोखा नांदण्यासाठी केली दुआ

## बुलढाण्याच्या अलिजा शेखने जपली गंगा-जमुना तहजीब संस्कृती; सर्वधर्मसमभावाचा दिला संदेश

जनसंचलन/बुलढाणा



एकीकडे आधुनिकतेच्या काळात धार्मिक भिंती उभ्या केल्या जात असताना, बुलढाण्यातील एका नऊ वर्षांच्या चिमुकलीने मात्र आपल्या पहिल्याच उपवासातून (रोझा) संपूर्ण देशाला गंगा-जमुना तहजीब संस्कृतीचा आणि सामाजिक सलोख्याचा अनोखा संदेश दिला आहे. शहरातील माऊंट सनाई इंग्लिश स्कूलमध्ये शिकणाऱ्या अलिजा शेख मोहम्मद वसीम हिने १९ फेब्रुवारी रोजी आयुष्यातील पहिला रमजानचा उपवास धरला आणि अल्लाकडे आपल्या भारत देशात सर्व जाती-पातीच्या लोकांनी गुण्यागोविंदाने राहावे, अशी प्रार्थना केली. अलिजा ही बुलढाण्यातील पत्रकार वसीम शेख अनवर यांची कन्या आहे. वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी तिने रमजानचा पहिला उपवास ठेवण्याचा संकल्प केला. सूर्योदयापूर्वी सहरी करून तिने उपवास धरला आणि दिवसभर अल्लाची इबादत केली. उपवासाच्या काळात तिने अल्लाकडे स्वत:साठी काहीही न मागता, माझ्या भारत देशात सर्व लोक खुशहाल असावेत आणि सर्व जाती-धर्माच्या लोकांनी गुण्यागोविंदाने एकत्र राहावे अशी दुआ केली. तिच्या या संवेदनशील विचारांमुळे सर्वत्र तिचे कौतुक होत आहे.

मुलीचा पहिलाच उपवास असल्याने शेख कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. संध्याकाळी सूर्यास्तानंतर इफ्तारसाठी अलिजाच्या आई-वडिलांनी तिचे आवडते विविध पकवान तयार केले होते. उपवास सोडल्यानंतर अलिजाने आपला आनंद व्यक्त केला. ती म्हणाली की, माझ्या वयाच्या इतर मुला-मुलींनीही उपवास धरले पाहिजेत, अल्ला त्यांना नक्कीच हिम्मत देईल.आजच्या काळात अलिजासारख्या लहान मुलीने देशाच्या एकात्मतेसाठी केलेली ही प्रार्थना खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभाव आणि गंगा-जमुना तहजीब संस्कृतीचा प्रत्यय देणारी ठरली आहे. नऊ वर्षांच्या चिमुकलीने दाखवलेली ही समज आणि सामाजिक जाणिव पाहून सामाजिक स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चिखला येथे संतापजनक प्रकार! महिला लोकप्रतिनिधीला मारहाण; आमदार सिद्धार्थ खरात आक्रमक

जनसंचलन/ लोणार



तालुक्यातील चिखला येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावरून सुरू झालेला वाद आता गंभीर वळणावर पोहोचला आहे. पुतळा हटवण्याच्या हालचालींना विरोध करण्यासाठी गेलेल्या शिवसेना (उबाठा) महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ यांच्यावर सरपंच व त्यांच्या समर्थकांकडून पोलिसांसमोरच मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. झटापटीदरम्यान त्यांचे कपडे फाडल्याचा आरोप करण्यात आल्याने जिल्हाभरात संतापाची लाट उसळली आहे. काही दिवसांपूर्वी अज्ञात व्यक्तींनी गावात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला होता. तो हटवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती मिळताच संजीवनी वाघ घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी तीव्र आक्षेप घेतल्यानंतर वातावरण तापले. त्यानंतर जमावाने त्यांना घेरून मारहाण केल्याचा आरोप आहे. घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून, पोलिसांच्या उपस्थितीतच प्रकार घडल्याचा आरोप अधिक गंभीर मानला जात आहे.

या घटनेनंतर संजीवनी वाघ यांनी सोशल मीडियावर आत्महत्येचा इशारा देणारे स्टेटस ठेवल्याने खळबळ उडाली. प्रशासनाने तात्काळ दखल घेत पोलिस बंदोबस्त वाढवला असून गावात तणाव कायम आहे. दरम्यान, मेहकर-लोणार मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत पोलिस प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश दिले. ङ्कदोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून अटक झालीच पाहिजे; कारवाईशिवाय मी येथून हलणार नाही,फ्फ अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. या घटनेची दखल मनोज जरांगे पाटील यांनी घेतल्याची माहिती असून, ते लवकरच भेट देणार असल्याची चर्चा आहे. चिखला येथील प्रकारामुळे शिवप्रेमींमध्ये तीव्र संताप उसळला असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# संतनगरी शेगाव येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळ्याचे आयोजन.!

जनसंचलन/बुलढाणा



जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत अंनत श्री विभूषीत जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिणपीठ नाणीजधाम यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळयाचे आयोजन दिनांक २२ व २३ फेब्रुवारी २०२६ रोजी ज.न.म. संस्थान, उपपीठ पश्चिम विदर्भ, चिंचोली फाटा (सवर्णा), खामगाव हायवे, ता. शेगाव, जि. बुलढाणा येथे सकाळी ९:०० वाजता आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पश्चिम विदर्भ पीठ प्रमुख श्री कुंडलिकराव वायभासे, व्यवस्थापक श्री सुरेश मोरे, पीठ प्रसिद्धी प्रमुख अमर इधोळ यांनी एका प्रसिध्दी प्रत्रकाद्वारे दिली आहे.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने संस्थानाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात जसे की, ग्रामस्वच्छता अभियान, शैक्षणिक उपक्रमांतर्गत इंग्रजी माध्यमांची मोफत शाळा, मोफत वेदपाठ शाळा, रक्तदान शिबिर, वैद्यकीय उपक्रमांतर्गत मोफत दवाखाना, मरणोत्तर देहदान, मोफत रुग्णवाहिका सेवा - महाराष्ट्रात विविध महामार्गावर ५३ रुग्णवाहिका २४ तास अखंडपणे अपघातग्रस्तांच्या सेवेत कार्यरत आहेत. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे पुनर्वसन, महिला सक्षमीकरण अंतर्गत मोफत शिलाई यंत्र वाटप, मोफत घरघंटी वाटप, आपत्कालीन मदत उपक्रम, कायदेविषयक साक्षरता शिबिरे, रक्तदान शिबिरांतर्गत या वर्षी जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून अवघ्या १५ दिवसांमध्ये १,७१,१५० रक्त कुपिंकांचे संकलन करण्यात आले, ब्लड इन नीड, ङ्कएक पेड माँ के नामङ्क वृक्षारोपण उपक्रमांतर्गत १,१०,६८७ वृक्षारोपण नोव्हेंबर २०२५ महिन्यांमध्ये करण्यात आले, इत्यादी उपक्रम आयोजित केली जातात.

या कार्यक्रमासाठी पश्चिम विदर्भ पिठ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक भक्त, साधक, शिष्य, हितचिंतक यांनी दि. २२ व २३ फेब्रुवारी २०२६ रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रवचन व दर्शन सोहळ्याचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमात दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी साधक दीक्षा व २३ फेब्रुवारी २०२६ रोजी उपासक दीक्षा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी उपासक दीक्षा व उपासक यांनी साधक दीक्षा घेण्यासाठी नोंदणी करावी. या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळयासाठी येणाऱ्या भाविकांसाठी कार्यक्रमाच्या दोनही दिवस महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या महंन्मंगल समयी आपण सर्वांनी सहकुटुंब, सहपरिवार, आप्तइष्ट मित्रांसह उपस्थित राहून परमश्रद्धेय रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या प्रवचन व दर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा.असे आवाहन पीठ इंजिनिअर श्री दिपक चिंचोले, पीठ महिला प्र. व जिल्हा निरीक्षक सौ लताताई चिंचोले, पीठ सदस्य श्री संतोष दसरे, जिल्हा अध्यक्ष श्री गणेश खडोळ, जि. म. अध्यक्षा सौं निंभोरे ताई तसेच पश्चिम विदर्भ पीठ समिती, जिल्हा तालुका व संतसंग सेवा समिती यांनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८